महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९८७ /२०२३ दि. २८/११/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **लोकमत मिडीया प्रा. लि.** यांचे वतीने आरोग्याविषयी नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी या हेतूने दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ०५:०० ते १०:०० वाजेपावेतो **'लोकमत महामॅरेथॉन'**चे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेमध्ये बहुसंख्य स्पर्धक भाग घेणार असून स्पर्धा पाहण्यासाठी मोठया प्रमाणात प्रेक्षकांची गर्दी होते. त्यामुळे स्पर्धेच्या कालावधीत सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) बिरसा मुंडा चौकातून पवारनगर कडे जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **बिरसा मुंडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** बिरसा मुंडा चौकातून पवारनगर कडे जाणाऱ्या वाहनांसाठी पवारनगर कडून बिरसा मुंडा चौकाकडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून वरील वाहने इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) वसंत विहार चौक कडून डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **वसंत विहार चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** वसंत विहार चौकातून डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडे जाणाऱ्या वाहनांसाठी डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडून वसंत विहार चौक कडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून वरील वाहने इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडून खेवरा सर्कल कडे जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. काशिनाथ घाणेकर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** डॉ. काशिनाथ घाणेकर चौकातून खेवरा सर्कल कडे जाणाऱ्या वाहनांसाठी खेवरा सर्कल कडून डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून वरील वाहने इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) खेवरा सर्कल कडून टिकुजीनीवाडी सर्कल कडे जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **खेवरा सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** खेवरा सर्कल कडून टिकुजीनीवाडी कडे जाणाऱ्या वाहनांसाठी टिकुजीनीवाडी सर्कल कडून खेवरा सर्कल कडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून वरील वाहने इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) मुल्ला बाग निळकंठ ग्रीन बी कडून टिकुजीनीवाडी सर्कल कडे जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **निळकंठ ग्रीन बी गेट नं. ०१ व व्हेरिएंट सोसायटी गेट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मुल्ला बाग बस डेपो मार्गे सर्व्हिस रोडने इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ०५:०० ते १०:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.